क्र. पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३ मुंबई, दिनांक :-०४/०८/२०२३

**संदर्भ :-** या कार्यालयाचे आदेश क्र. पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३, दि.२६/०६/२०२३

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत

*****

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भाधीन आदेश दि.२६/०६/२०२३ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अग्रिमाची रक्कम अदा केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून मुद्दलाची वसुली संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या वेतनातून न चुकता करण्यात यावी. सदरची रक्कम पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत म्हणजेच जुलै २०२३ च्या वेतनातुन वसूल केलेल्या अग्रिमाच्या हप्त्यांची रक्कम ५ ऑगस्ट पर्यंत पोलीस महासंचालक यांचे ॲक्सीस बँक खात्यावर जमा करावी.

परंतु असे निर्देशनास आले आहे की, बहुतेक घटक कार्यालयानी संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना मंजुर झालेली घरबांधणी अग्रिमाची रक्कम माहे जुलै-२०२३ मध्ये त्यांना वितरीत केली असून त्याप्रमाणे सॉफ्टवेअरमध्ये UTR अपडेट केले आहेत, त्यामुळे सॉफ्टवेअरमध्ये त्यांचा पहिला हप्ता माहे जुलै-२०२३ ऐवजी ऑगस्ट-२०२३ मध्ये दिसुन येणार आहे.

**त्यामुळे संबंधीत घटक प्रमुख यांनी घरबांधणी अग्रिम हप्त्याच्या वसुलीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-**

१. ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे नावापुढे सॉफ्टवेअर मध्ये माहे जुलै-२०२३ या महिन्याच्या समोर UTR अपडेट करण्याकरीता Option उपलब्ध असेल तरच संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची वसुल केलेली हप्त्याची रक्कम या कार्यालयास पाठवुन त्याचा UTR सॉफ्टवेअर मध्ये अपडेट करावा.

२. ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या नावासमोर सॉफ्टवेअर मध्ये माहे जुलै-२०२३ या महिन्याच्या समोर UTR अपडेट करण्याकरीता Option उपलब्ध नसेल तर त्यांची रक्कम या कार्यालयास पाठवु नये. त्यांच्या नावासामोर पुढील महिन्यात UTR अपडेट करण्याकरीता Option उपलब्ध होईल. तेंव्हा सदर वसुल केलेली रक्कम पुढील महिन्यात ५ तारखेपर्यंत या कार्यालयास पाठवावी, व त्याचा UTR सॉफ्टवेअरमध्ये अपडेट करावा.

३. ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या नावासमोर सॉफ्टवेअर मध्ये माहे जुलै महिन्याच्या समोर UTR अपडेट करण्याकरीता Option उपलब्ध नसेल, परंतु घटक कार्यालयाने जुलै महिन्याची हप्त्याची रक्कम यापुर्वीच संबंधीतांकडून वसुल करुन या कार्यालयाच्या बँक खात्यावर पाठविली असेल, तर त्यांनी पुढील महिन्यात पुन्हा हप्त्याची रक्कम पाठविण्याची आवश्यकता नाही. त्यांनी माहे जुलै महिन्यात पाठवलेल्या रक्कमेचा पुढील महिन्यात सॉफ्टवेअरमध्ये UTR अपडेट करण्याकरीता Option उपलब्ध झाल्यानंतर सदर UTR अपडेट करावा.

तसेच खालील नमुद घटक कार्यालयास कळविण्यात येते की, **बँक ऑफ इंडिया यांचेसोबत झालेल्या करारानुसार हप्ता बँकेत वेळेवर भरला गेला नाही, तर बँकेकडून २% प्रतीवर्षप्रमाणे अतिरिक्त दंड व्याज आकारणी केली जाणार आहे. त्यामुळे लाभार्थींच्या वेतनातून कपात केलेली मासिक हफ्त्याची वसुलीची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी पाठविण्याची दक्षता घ्यावी.**

०४/८/२३

**( निसार तांबोळी)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य. मुंबई(सस्नेह)
मा.पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य. मुंबई

मा.महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचलाक, अर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह)
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नवी मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट पोलीस अकादमी पुणे
अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९/ राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे/ नागपूर
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन/नागपूर/ नाशिक/ गुन्हे अन्वेषण व प्रशिक्षण विद्यालय, नाशिक/विशेष कृती दल, नागपूर/ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद/ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती/ अंगुली मुद्रा मुंबई
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र (रा.रा.पो.बल.नानवीज सह)/ अपारंपारिक अभियान प्रशिक्षण, केंद्र, नागपूर/UCTC- मुंबई
उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ कोल्हापूर/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/नांदेड/ पुणे

प्रत माहितीस्तव,

मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी मुंबई